रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

**नोटीस २०१७-२०१८** दि. ०७/०८/२०१७

महाविद्यालयातील सर्व शिष्यवृत्ती व फ्रि-शिपधारक विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सन २०१७-१८ साठी शिष्यवृत्ती अर्ज सुरु झालेले आहे. संबंधीत विद्यार्थ्यांनी दि. १२/०८/२०१७ पासून सदर अर्ज **फक्त ऑनलाईनच** भरावेत. कोणत्याही विद्यार्थ्यांनी अर्ज नुतनीकरण करु नये. शिष्यवृत्ती व फ्रि-शिप अर्ज भरताना खालील गोष्टी काळजीपूर्वक भराव्यात व अर्जासोबत जोडून द्याव्यात. तसेच सदर अर्ज महाविद्यालयात वेळापत्रक दिल्यानंतर जमा करावेत. ( अर्ज भरण्यासाठी नवीन वेबसाईट mahadbt.gov.in )

| | |
|---|---|
| १. | महाविद्यालयातील सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड आपल्या बँक खात्याशी बँकेकडून लिंक करुन घेणे अनिवार्य आहे. तसेच आधार कार्डला आपला मोबाईल नंबर लिंक करुन संबंधीत मो.नं. बँक खात्याला लिंक करणे अनिवार्य आहे. आधार कार्ड लिंक केले नाही व त्यामुळे शिष्यवृत्ती मिळाली नाही **तर होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.** तसेच शिष्यवृत्ती / फ्रि-शिप अर्ज भरण्यासाठी डोमासाईल सर्टिफिकेट व रेशन कार्ड असणे बंधनकारक आहे. |
| २. | शिष्यवृत्ती अर्जासाठी **शाळा सोडल्याच्या दाखल्याची तसेच इतर महाविद्यालयातून आलेल्या विद्यार्थ्यास संबंधीत महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स जोडणे बंधनकारक आहे. तसेच या महाविद्यालयातून १२ वी उत्तीर्ण होऊन एफ.वाय.बी.कॉम./ बी.बी.ए.सी.ए. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचा १२ वी सोडल्याचा दाखला व दहावीचा शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स जोडणे अनिवार्य आहे.** विद्यार्थ्याकिडे सदर झेरॉक्स नसेल तर अशा संबंधीत विद्यार्थ्यांनी ती झेरॉक्स उपलब्ध करुन घेणे. त्या शिवाय शिष्यवृत्ती अर्ज **समाज कल्याण कार्यालयाकडून स्वीकारले जात नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.** |
| ३. | विद्यार्थ्याचा प्रवेश अनुदानित तुकडीत झालेला असेल तर शिष्यवृत्ती अर्ज भरताना **अनुदानितच** टाकावे. तसेच प्रवेश विनाअनुदानित असेल तर **विनाअनुदानितच** टाकावे. तसेच जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, बँक खाते नंबर, आधारकार्ड नंबर व बँकेला लिंक केलेला मोबाईल नंबर अचूक टाकावा व अर्ज भरल्यानंतर बरोबर असल्याची स्वत: खात्री करुनच अर्ज महाविद्यालयात जमा करावा. |
| ४. | व्यावसायिक कोणतेही शिक्षण पूर्ण किंवा अर्धवट घेतल्यांनर ज्युनिअर महाविद्यालय तसेच बी.कॉम, एम.कॉम., बी.बी.ए.सी.ए,, एम.सी.ए. या वर्गासाठी संबंधीत विद्यार्थ्यास **शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिप मिळणार नाही.** अशा विद्यार्थ्यांनी समाज कल्याण कार्यालय अहमदनगर येथे जाऊन माहिती घेणे. **तसेच १० वी नंतरच्या डिप्लोमा किंवा अन्य व्यावसायिक कोर्स पूर्ण किंवा अर्धवट करुन आलेला असल्यास सदर विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिप मिळणार नाही.** |
| ५. | **तसेच विद्यार्थी व्यावसायिक शिक्षण अर्धवट सोडून आलेला असल्यास व त्या महाविद्यालयात कोणती ही शिष्यवृत्ती किंवा फी सवलत घेतलेली नसल्यास त्या महाविद्यालयातून तसे पत्र घेऊन यावे. तसेच या पत्रावर समाज कल्याण कार्यालयाकडून मंजूरी मिळाल्यावर संबंधीत विद्यार्थ्यांला शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिपचा अर्ज भरता येईल. (समाज कल्याण कार्या. अहमदनगर फोन नं. ०२४१-२३२९३७८ / २३२४६०१ )** |
| ६. | **ओ.बी.सी./ एस.बी.सी./ एन.टी./ मधील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख ते सहा लाख रुपयांपर्यंत असेल अशा विद्यार्थ्याना फ्रि-शिप अर्जासाठी इतर कागदपत्रांबरोबर नॉन-क्रिमिलियरचा दाखला जोडने अनिवार्य असेल. या शिवाय सदर फ्रि-शिप अर्ज समाज कल्याण कार्यालयाकडून स्वीकारले जाणार नाही.** |
| ७. | **११ वीत प्रवेश घेतलेल्या एस.सी./ एस.बी.सी./ एन.टी. मधील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यास ७५ % किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारी असेल अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाबरोबर राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीचा अर्ज देखील भरता येईल याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.** |
| ८. | बी.बी.ए.सी.ए. भाग-१ मध्ये प्रवेश घेतलेल्या एस.टी. (अनुसूचित जमाती) कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांना खालील दिलेल्या कागदपत्रांशिवाय **जात-पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.** या शिवाय संबंधीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिप मिळणार नाही. याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. |
| ९. | **शिष्यवृत्ती अर्जाबरोबर खालील दिलेले कागदपत्रांची झेरॉक्स कॉपी सेल्फ अटेस्टेड करुन जोडावी.**<br>**(१) सन २०१६-१७ चा ओरिजनल उत्पन्नाचा तहसिलदार यांचेकडील दाखला जोडावा.**<br>(२) **डोमासाईल सर्टिफिकेट** (३) **रेशन कार्ड** (४) आधार कार्ड लिंक फॉर्म बॅकेच्या सही शिक्क्यासह (५) आधारकार्ड<br>(६) ११ वी पासून याच वर्गात असेल तर शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी. (७ ) बँक पासबुक<br>(८) बाहेरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाळेचा तसेच संबंधीत महाविद्यालय सोडलेल्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी. (९) जातीचा दाखला (१०) दहावी व त्यापुढील गुणपत्रक (११) ओ.बी.सी./ एस.बी.सी./ एन.टी./ मधील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा जास्त असेल अशा विद्यार्थ्यांना आपल्या फ्रि-शिप अर्जाबरोबर **नॉन-क्रिमिलियरचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.** |